**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
U. P.G.Admission Unit

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश विभाग

P.G. Office :- (0240) 2403123 WEBSITE : www.bamu.ac.in : http://bamua.digitaluniversity.ac E-mail : pgsection@bamu.ac.in

**संदर्भ:- वि.प.प्र.वि./२०२३-२०२४/4005** **दिनांक: ०७-१०-२०२३.**

# परिपत्रक

संदर्भ : १) विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठाने यापूर्वी एम.फिल. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लघुशोध प्रबंध सादर करण्यासाठी दिलेली मुदतवाढ दिनांक ३१ डिसेंबर, २०२२.

२) विद्यापीठाने यापूर्वी एम.फिल. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लघुशोध प्रबंध सादर करण्यासाठी दिलेली मुदतवाढ दिनांक ३० सप्टेबर, २०२३.

३) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून एम.फिल. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी लघुशोध प्रबंध सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेसंदर्भात मा. कुलगुरु महोदयांनी दिलेले आदेश दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३.

४) विविध विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी कृती समिती-२०२१ महाराष्ट्र राज्य संघटना यांनी विद्यापीठास सादर केलेले निवेदन दि. २८-०९-२०२३, १४-०९-२०२३.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाव्दारे विद्यापीठ परिसर व उपपरिसर येथे सुरु असलेल्या एम.फिल. अभ्यासक्रमाच्या सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या विभागामध्ये मागील शैक्षणिक वर्षांमध्ये एम.फिल. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी संदर्भ क्र. (१) व (२) अन्वये विहित केल्यानुसार विहित मुदतीत लघुशोध प्रबंध सादर न केल्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (१२) (७) अन्वये विहित केल्यानुसार अधिष्ठाता मंडळ व विद्यापरिषेदच्या वतीने सर्व संबंधित विद्यार्थ्यांना एम.फिल. अभ्यासक्रम पुर्णकरण्यात यावे म्हणून लघुशोध प्रबंध सादर करण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत अंतिम स्वरुपाची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपणास असे हि अवगत करण्यात येते की, आपल्या विभागाअंतर्गत एम.फिल. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत यापूर्वी लघुशोध प्रबंध सादर न केल्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन उक्त प्रकरणी सूचित करुन विहित शुल्कासह निर्धारित कालावधीत **अतिरिक्त दंड रु. ५०००/- शुल्क भरणा** करण्याच्या अटीवर सर्व संबंधित विद्यार्थ्यांना एम.फिल. अभ्यासक्रमाचे लघुशोध प्रबंध सादर करण्यासाठी अंतिम स्वरुपाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

उपकुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रतिलिपी,

१) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

३) मा. वित्त व लेखाधिकारी, वित्त लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

४) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

५) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

Sd/-
उपकुलसचिव